# ‘कालिदास साहित्याचे नवे आयाम शोधावे’

म.टा. प्रतिनिधी, नागपूर

‘कालिदास साहित्याचा गेल्या तीस वर्षातील इंग्रजी भाषेत निर्माण झालेल्या इको क्रिटीसिझम, बिल ब्राऊनची थिंग थेअरी, रिसेप्शन थेअरी यांच्या संदर्भात नवीन संशोधकांनी करावा. त्याच्या साहित्याचा अभ्यास या नवसिद्धांतांच्या संदर्भात विशेषत्वाने केल्यास कालिदास साहित्य हे विश्वपटलावर नव्या सुप्रतिष्ठीत होईल. त्यामुळे तरुण संशोधकांनी कालिदास साहित्याचा नव्या आयामांच्या नवसिद्धांतांच्या परिप्रेक्ष्यात परामर्श घ्यावा’, आवाहन आर. एस. मुंडले धरमपेठ कला - वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. संध्या नायर यांनी केले.



आमदार निवास येथे झालेल्या संस्कृत परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना डॉ. संध्या नायर.

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ व राष्ट्रीय संस्कृत संस्थान दिल्ली द्वारे प्रायोजित एक दिवसीय राष्ट्रीय संस्कृत परिषदेचे उद्घाटन आमदार निवास सभागृहात झाले. राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठाच्या मुक्त विद्यापीठ केंद्राचे संचालक प्रो. रमाकांत पांडे, कुलसचिव डॉ. अरविंद जोशी, परिषदेच्या समन्वयक डॉ. नंदा पुरी, सहसमन्वयक डॉ. कविता होले यांची प्रमुख उपस्थिती होती.

‘आपण संस्कृत जनांनी अन्य भाषांचा आदर आणि भाषेच्या विकासासाठी शब्दांचे आदान-प्रदान करावे’, असे आवाहन प्रो. रमाकांत पांडे यांनी केले. डॉ. नंदा पुरी यांनी बीजभाषण केले. भामह, दण्डी, उद्भट, आनंदवर्धन, अभिनवगुप्त आदी संस्कृत साहित्यशास्त्रज्ञांवर कालिदासाचा कसा प्रभाव पडला हे त्यांनी सोदाहरण स्पष्ट केले. कुसुमाग्रज, शांता शेळके, चिंतामण देशमुख आदी कविंनी केलेल्या समश्लोकीची तौलनिक काव्यशास्त्रीय समीक्षा केली. अध्यक्षीय भाषणात डॉ. उमा वैद्य यांनी कालिदास साहित्याचा प्रचार व प्रसार आणि संस्कृत भाषेच्या पुनरुज्जीवनाच्या चळवळीला प्रेरण देण्याकरिता विद्यापीठातर्फे परिषदेचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले. प्रास्ताविक डॉ. मधुसूदन पेन्ना यांनी तर सूत्रसंचालन प्रा. पराग जोशी यांनी केले. डॉ. कलापिनी अगस्ती यांनी आभार मानले.